# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २९९-२०२४** **दिनांक :- १३/०८/२०२४**

## "जुलै महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार"

## जुलै महिन्यातील उत्कृष्ठ दोषसिद्ध झालेले गुन्हे

➢ **मिरारोड विभाग (खून) :-**

**१. काशिमीरा पोलीस स्टेशन गुरनं ६७०/२०१६ भा.द.वि.सं.का.क. ३०२, २०१, ३९४, ३४ प्रमाणे.**

काशिमीरा पोलीस स्टेशन गुरनं ६७०/२०१६ भा.द.वि.सं.का.क. ३०२,२०१,३९४,३४ प्रमाणे दिनांक २३.११.२०१६ रोजी दाखल असून गुन्हयातील अज्ञात आरोपीत यांनी मयत नामे शिवशंकर ऊर्फ निकु शिवप्रसाद चौरसीया, वय २३ वर्षे, रा. मुंबई जि.ठाणे येथे घेवून येवून त्याचे अंगावरील १,७३,७३६/- रुपये किंमतीचा ऐवज काढून घेवून, वजनदार दगडाने डोकीत मारुन, गंभीर दुखापती करुन, त्याची ओळख पटू नये याकरीता त्याचा चेहरा दगडाने ठेचून त्यास जीवे ठार मारले होते.पो.नि. श्री विलास सानप, तत्कालीन प्रभारी अधिकारी, काशिमीरा पोलीस ठाणे यांनी गुन्हयाचा सर्वांगीण व सखोल तपास करुन नमुद गुन्हा उघडकीस आणून गुन्हयातील आरोपीत नामे १. कमलेश राजदेव सहानी, २. रुपेश रम्भु साह, ३. मन्टु रामाधर पटेल यांना अटक करुन, त्यांचेविरुध्द सबळ पुरावे गोळा करुन गुन्हयाचे दोषारोपपत्र मा.जिल्हा सत्र न्यायालय, ठाणे येथे दाखल केले होते त्याचा सेशन केस क्रमांक २४९/२०१८ असा आहे. सत्र न्यायाधीश, ठाणे यांनी दिनांक ०६.०७.२०२४ रोजी गुन्हयातील तीन्ही आरोपीत यांना (१) भा.दं.वि. ३०२, ३४ करीता दोषी धरुन आजीवन कारावास व प्रत्येकी २,५००/- रु. दंड व दंड न भरल्यास ०७ दिवस सश्रम कारवास, (२) भा.दं.वि. २०१, ३४ करीता ०३ वर्षे सश्रम कारावास व प्रत्येकी २,५००/- रुपये दंड व दंड न भरल्यास ०७ दिवस सश्रम कारावास, (३) भा.दं.वि. ३९४, ३४ करीता १० वर्षे सश्रम कारावास व प्रत्येकी २,५००/- रुपये दंड व दंड न भरल्यास ०७ दिवस सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

**सदरची कामगिरी करणारे काशिमिरा पोलीस ठाणेचे:-** १.श्री राजेंद्र कांबळे, वरि.पोलीस निरीक्षक, २. पोनि श्री विलास सानप (तपा. अधिकारी). ३. सफौ/अजय मांडोळे, ४. सफौ/राजेश पानसरे (दप्तरी/मदतनीस). ५. पोहवा/०६०२२ नितीन कासार. ६. पोशि/१४०५५साईदास चव्हाण ७. पोशि/१६०१५ अनिल मढवी (कोर्ट डयुटी अंमलदार). ८. पोहवा/१२०११ सचिन बर्डे (समन्स डयुटी) अ.क्र. २ सेवानिवृत्त, अ.क्र. ३ नेम. मा.पोलीस उपायुक्त कार्या. परि. १ मिरारोड, अ.क्र. ४ भाईंदर पोस्टे यांची दिनांक १०/०८/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये जुलै महिन्यातील दोषसिद्ध क्र. १ म्हणुन प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.

➢ **मिरारोड विभाग (बलात्कार सह पोक्सो) :-**

**मिरारोड पोलीस स्टेशन गुरनं २०१/२०१४, भारतीय दंड विधान संहिता कलम ३७६, ३६३, ३६६(अ) सह बालकांचे लैंगिक संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ३,४,९ व १० प्रमाणे.**

सदर गुन्हयात सरदार वल्लभभाई पटेल हायस्कुल समोरील झोपडपट्टीमधुन, मिरारोड पुर्व, ता. जि. ठाणे येथुन अज्ञात आरोपीने गुन्हयातील पिडीत मुलगी सुमी समीजुन शेख वय १४ वर्षे हिस फिर्यादी समीजुल रिजवान शेख यांचे कायदेशिर रखवालीतुन पळवुन नेवुन अपहरण केले आहे. म्हणुन अज्ञात आरोपी याचेविरुध्द मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. २०१/२०२४ भारतीय दंड विधान संहिता कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. गुन्हयाचे तपास दरम्यान पिडीत मुलगी पुणे येथे मिळुन आल्याने तिच्याकडे विचारपुस करता तिला गुन्हयातील आरोपी क्र. १ राशीद नबी शेख हयाने लग्नाचे अमिष दाखवुन पळुवन नेवुन तिच्यासोबत शारीरीक संभोग केला आहे. सदर आरोपीस अटक करण्यात आलेले

आहे. तद्नंतर पिडीत मुलीने मा. बालकल्याण समिती, ठाणे यांचे समक्ष तिचे वडील (गुन्हयाचे फिर्यादी) समीजुन रजिवान शेख यांनी तिचेवर वेळोवेळी जबरी संभोग करुन लैंगिक अत्याचार करीत असलेबाबत जबाबामध्ये सांगितल्याने पिडीत हिचे वडील आरोपी क्र. २ समीजुल रिजवान शेख यास अटक करण्यात आलेली आहे.बाजुस नमुद कॉलम मधील अ.क्रं.१ व २ यांनी गुन्हयातील मुख्य साक्षीदार यांना त्यांचे साक्षीबाबत सविस्तर ब्रिफींग केलेले आहे. त्याप्रमाणे अ.क्र. ३ हे गुन्हयाचे तपासीक अधिकारी आहेत. त्यांनी गुन्हयाचा सखोल तपास करुन अटक आरोपीतांविरुध्द सबळ पुराव्याअंती मा.न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले आहे. तसेच अ.क्र.४ यांनी मा. अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे यांचे न्यायालयात सुनावणी दरम्यान चोख कामकाज पार पाडलेले आहे. म्हणुन दिनांक ३०.०७.२०२४ रोजीच्या सुनावणीत, मा. अतिरिक्त सत्र न्यायालय, ठाणे यांनी आरोपी क्र. २ पिडीताचे वडील (गुन्हयाचे फिर्यादी) समीजुन रिजवान शेख यास भा.दं.वि.सं. कलम ३७६(३) सह पोक्सो कायदा कलम ३, ४, ९ व १० मध्ये वीस वर्षे सश्रम कारावास व रु. १५,०००/- दंड किंवा आर्थिक दंड न भरल्यास तीन आठवडे साधा कारावास अशी शिक्षा सुनावलेली आहे.

**सदरची कामगिरी करणा-या मिरारोड पोलीस ठाणेचे -** १.व.पो.निरी. चंद्रकांत सरोदे, २.पो.नि. मिलींद साबळे, गुन्हे, नेम. मिरारोड पोलीस ठाणे. ३.स.पो.निरी. रघुनाथ शिवाजी कळके, सध्या नेम. कोराडी पोलीस ठाणे, नागपुर शहर (तपासिक अधिकारी) ४.श्रेणी. पो.उप निरी. प्रकाश जाधव नेम. मिरारोड पोलीस ठाणे यांची दिनांक १०/०८/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये जुलै महिन्यातील दोषसिद्ध क्र. २ म्हणुन प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.

- **तुळींज विभाग (विनयभंग) :-**

तुळींज पोलीस स्टेशन गुरनं ३४६/२०१८ भा.द.वि.कलम ३६३, ३५४(बी) लैंगीक अपराधापासुन बालकांचे संरक्षण अधि.२०१२ चे कलम ८,१२ प्रमाणे.

सदर गुन्हयातील आरोपीत याने फिर्यादीस आवाज देवून त्याचेकडे कागदावर असलेला पत्ता वाचुन तो पत्ता कुठे आहे असे विचारुन फिर्यादीस सुरज बिल्डींगचे टेरेस पर्यंत घेवून गेला व तेथे फिर्यादीचे अंगावरील कपडे उतरवून लागला तेव्हा फिर्यादीने त्यास विरोध करुन स्वत:ला वाचविण्याचे प्रयत्नात बिडलंगचे अैरेस वरुन खाली उडी मारली असता बिल्डींगचे खालील लोकांनी तिला चादरीने झेल घेतला तरी फिर्यादीचे कमरेचे हाड फ्रॅक्चर झाले म्हणुन आरोपीत नामे रमेश गोविंद फाटक ऊर्फ पटेल वय २९ वर्षे याचे विरुध्द तुळींज पोलीस ठाणे येथे गुन्हा  दाखल आहे. सदर गून्हयातील आरोपीत रमेश गोविंद फाटक ऊर्फ पटेल वय २७ वर्षे पालघर यास तुळींज पोलीस ठाणे गुरक्र ३५१/२०१९ भादविस कलम ३५४ सह लैंगीक अपराधापासुन बालकांचे संरक्षण अधि.२०१२ चे कलम ८,१२ प्रमाणे मध्ये अटक केली असता सदर गून्हयातून  ताबा घेवून अटक करण्यात आलेली आहे. बाजुस नमुद कॉलम मधील अ.क्रं. १ व २ यांनी गुन्हयातील मुख्य साक्षीदार यांना त्यांचे साक्षीबाबत सविस्तर ब्रिफींग केलेले आहे. त्याप्रमाणे अ.क्र. ३ हे गुन्हयाचे तपासीक अधिकारी असून अ.क्र.७ हे त्यांचे रायटर आहेत. त्यांनी गुन्हयाचा सखोल तपास करुन अटक आरोपीतांविरुध्द सबळ पुराव्याअंती मा.न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले आहे. तसेच अ.क्र. ४ व ५ यांनी मा. अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायालय, वसई यांचे न्यायालयात सुनावणी दरम्यान चोख कामकाज पार पाडलेले आहे. म्हणुन दिनांक ०३.०७.२०२४ रोजीच्या सुनावणीत, मा. अतिरिक्त सत्र न्यायालय, वसई यांनी आरोपी रमेश गोविंद फाटक ऊर्फ पटेल वय २७ वर्षे रा.सुभाष चाळ,ईलेक्ट्रीक टॉवर खाली,विरार फाटा,विरार पुर्व,ता.वसई जि.पालघर यास भा.द.वि.कलम ३६३,३५४(बी) लैंगीक अपराधापासुन बालकांचे संरक्षण अधि.२०१२ चे कलम ८,१२ प्रमाणे ५ वर्षे व २,०००/-रुपये दंड, दंड न भरल्यास ०१ महीना साधा कारावास अशी शिक्षा सुनावलेली आहे.

**सदरची कामगिरी करणारे तुळींज पोलीस ठाणेचे** १) व.पो.निरी. शैलेंद्र नगरकर, २) पो.नि.सुधीरचव्हाण, गुन्हे, तुळींजपोस्टे. ३) स.पो.निरी./दिपक गिरकर, सध्या सेवानिवृत्त (तपासिक अधिकारी) ४) श्रेणी पोउनि/जी.एच.दिघोळे, ५) पोह/०७०७३ वाय.बी.भेस्कर, ६) पोह/काका पाटील व ७) पोह/अशोक तांडेल ८.पोहवा/मुनाफ तडवी यांची दिनांक १०/०८/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये जुलै महिन्यातील दोषसिद्ध क्र. ३ म्हणुन प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.

# जुलै महिन्यातील गुन्हयांची उत्कृष्ठ उकल

➢ **गुन्हे शाखा, कक्ष - ३ (दरोडा) :-**

पेल्हार पोलीस स्टेशन गुरनं ५७६/२०२४ भारतीय न्याय संहीता ३१० (२), १२७ (२), ३५२, ११५ (२) प्रमाणे.

पेल्हार पोलीस स्टेशन गुरनं ५७६/२०२४ भारतीय न्याय संहीता ३१० (२), १२७ (२), ३५२, ११५ (२)प्रमाणे.

दि.०३/०७/२०२४ रोजी नेमिकाब केबल इंडस्ट्रिज, रिचर्ड कंपाऊण्ड,मनिचापाडा,नालासोपारा पूर्वता.वसईजि.पालघर या कंपनीचे रुममध्ये दरवाजा पुढे करुन झोपलेलो असतांना व वॉचमन विनोद हा बाहेरच्या बाजुस पहायावर असताना रात्रौ ०२.०० वा.चे सुमारास ७ ते ८ तोंडावर रुमाल बांधलेले अनोळखी इसमांनी मला व वॉचमन विनोद यास शिवीगाळ करुन मारहाण केली व आमचे हातपाय बांधुन रुममध्ये टाकुन कंपनीचे शटर उचकटुन कंपनीतुन माझे माहीतीनुसार अंदाजे १४,००,०००/- किंमतीचे तयार केबल व रॉ कॉपर मटेरीयलचे बंडल जबरदस्तीने चोरी करुन आयशर सारख्या गाडीतुन घेऊन पळुन गेले म्हणुन फिर्यादी नामे - सुनिल रामदास यादव, वय ३० वर्ष, यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तपासा दरम्यान तांत्रीक विश्लेषण व मिळालेल्या गोपणीय बातमीवरुन आरोपीत नामे - १) रियाजुल रेहमान शेख वय-३७ वर्षे,व कार मधील उर्वरीत तीन इसम यांनी आपली नावे २) ईशान अब्दुल रेहमान शेख वय ४१-वर्षे, ३) राजूप्रसाद रामखिलावण विश्वकर्मा वय-३६ वर्षे,४) विजय किसन वाख वय-२९ वर्षे,असे सांगितले. मोटरसायकल चालक याने आपले नाव ५) कुणाल उर्फ शिवराम सोमा खडके वय ३४ वर्षे, व मोटर सायकलच्या पाठीमागे बसलेल्या इसम यांनी आपले नाव ६) कुणाल सुनिल जाधव वय ३० वर्षे, ७) सद्दाम रहिस मनिहार वय ३० वर्षे, तसेच ट्रक मधुन आलेला इसम यास त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने आपले नाव ८)सलिम फत्ते मोहम्मद अन्सारी वय ४० वर्षे, यांना दिनांक ०६/०७/२०२४ रोजी सदर गुन्हयातील चोरीस गेलेला मुद्देमाल व गुन्हा करणे करीता वापरण्यात आलेले ट्रक व मोटार सायकल असा ६०,०९,०००/- रुपये किंमतीच्या मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले असुन उक्त आरोपीत यांना पुढील कारवाई करीता पेल्हार पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे.

**सदरची कामगिरी करणारे गुन्हे कक्ष ३ चे** १) पो.नि/ प्रमोद बडाख, २) पोउपनिरी/उमेश भागवत, ३) पोहवा/ अशोक पाटील, ४) पो.हवा/मनोज चव्हाण ५) पो.हवा/सचिन घेरे, ६) पो.हवा/ मुकेश तटकरे ७) पोहवा/ सागर बारावकर, ८) पो.हवा/ अश्विन पाटील ९) पो.अं./ राकेश पवार, १०) पो.अं./ सुमित जाधव, ११) पो.अं./ सुनिल पाटील १२) पो.अं./ युवराज वाघमोडे १३) पो.अं/ मनोज तारडे १४) पो.अं./ तुशार दळवी यांचा दिनांक १०/०८/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"जुलै महिन्यातील गुन्हयांची उकृष्ठ उकल"** क्र. १ म्हणुन प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.

➢ **गुन्हे शाखा, मध्यवर्ती कक्ष (दरोडयामधील आरोपीवर अवैध अग्निशस्त्र कारवाई) :-**

**नालासोपारा पोलीस स्टेशन गुरनं. ७५/२००८ भादविसक ३९५,३९७,३४२,३४आर्म ॲक्ट कलम ३,२५ प्रमाणे.**

नालासोपारा पोलीस ठाणे गुरनं. ७५/२००८ भादविसक ३९५, ३९७, ३४२, ३४आर्म ॲक्ट कलम ३,२५ प्रमाणे फर्यादी नामे मुकेश नामालाल जैन याचे शॉप नं.११,टोपाझ शॉपींग सेंटर,तुळींज रोड, नालासोपारा पुर्व येथे सरगम गोल्ड नांवाचे ज्वेलर्सचे दुकान होते. दिनांक २४.०२.२००८ रोजी १०.३० वाजता फिर्यादी हे आपले दुकानात बसले असतांना आरोपीतांना दागीने पहाण्याचा बहाणा करुन दुकानात प्रवेश करुन फिर्यादीस रिव्हाल्वर, चॉपरचा धाक दाखवून मारहाण करुन दुकानातील कॅबीनमध्ये फिर्यादीचे हातपाय बांधुन कोंडुन ठेवून दुकानातील ४०,१०,०००/-रुपये किमतीचे सोन्याचे दागीने, नोकीया कंपनीचा मोबाईल फोन जबरी दरोडा टाकुन चोरी करुन नेल्याने नालासोपारा पो.स्टे. गुन्हा दाखल आहे. तपासात आरोपी १) वसंत चांगदेव म्हात्रे २) सौ.बायणबाई रामराव वाघमारे ३) सौ.कुसुम दिलीप कोरडे ४) सौ. इंदुबाई दत्तराव लोंबणे ५) दिपक जगदीश रोडा यांना गुन्हा दाखल झाल्यानंतर अटक करुन त्यांचे विरुध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आले होते परंतु पाहीजे आरोपी नामे जॉनी ऊर्फ जर्नादन वाघमारे रा. नांदेड हा गुन्हा दाखल झाले पासुन पोलीसांना मिळुन येत नव्हता. गुन्हा अतिशय गंभीर स्वरुपाचा असल्याने तसेच नमुद गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे जॉनी ऊर्फ जर्नादन वाघमारे रा. नांदेड यांचा यापुर्वी सर्वोतोपरी शोध घेऊन देखील तो गेल्या १७ वर्षापासुन मिळुन येत नव्हता.त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथकाने सदर गुन्हयाची नालासोपारा पोलीस ठाणेतुन माहीती घेऊन त्यांनतर सलग ०१ महिन्यांपासुन अहोरात्र मेहनत घेवुन तपासात सातत्य ठेवून आरोपीची गोपनीय माहिती काढली असता पोशि. नितीन राठोड यांना पाहीजेत आरोपी जॉनी ऊर्फ जर्नादन वाघमारे हा नांदेड ऐवजी सध्या मु. भांडेगाव, ता.जि. हिंगोली येथे राहत असल्याची माहीती समजली. त्यावेळी पोलीस पथकाने हिंगोली या ठिकाणी जावून नमुद

गावात सापळा लावला. आरोपीबाबत खात्री होताच स्थानिक पोलीसांचे मदतीने पाहीजेत आरोपी जॉनी ऊर्फ जर्नादन वाघमारे यास दि. १२.०७.२०२४ रोजी १३.०० वाजता शिताफिने ताब्यात घेण्यात आलेले आहे. नमुद आरोपीचे पुर्ण नांव जर्नादन ऊर्फ जॉनी रामराव वाघमारे, वय-४३ वर्षे रा.भांडेगाव, ता.जि. हिंगोली असे असल्याचे निष्पन्न झाले आहे. नमुद पाहीजे आरोपीस पुढील कारवाई करीता नालासोपारा पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले आहे.

**सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा, मध्यवर्ती कक्षाचे** - १) पोनिरी. राहुल राख २) पोनिरी. धनंजय पोरे ३) सपोनिरी. दत्तात्रय सरक ४) सपोनिरी. नितीन बेंद्रे ५) पोउपनिरी. हितेंद्र विचारे ६) सफौ. ९४०१८ श्रीमंत जेधे ७) सफौ.९६०५०मनोहर तावरे ८) पोहवा.०६०५६ शिवाजी पाटील ९) पोहवा.०७०३३ गोविंद केंद्रे १०) पोहवा.०७१६३ हनुमंत सुर्यवंशी ११) पोहवा. ९६०२६ आसिफ मुल्ला १२) पोहवा. ०३०४४ संतोष मदने १३) पोहवा.०४००९ संग्राम गायकवाड १४) पोहवा.०६०३० राजविर संधु १५) पोहवा.०७०६२ राजाराम काळे १६) पोहवा. ०७१५४ प्रविणराज पवार १७) पोहवा. ०७१११ सतिश जगताप १८) पोहवा. ०८०२० महेश वेल्हे १९) पोहवा.१२०१० अनिल नागरे २०) पोशि. ३४४९ अकील सुतार २१) पोशि. २३१२७ नितीन राठोड २२) पोशि.२३०५६ साकेत माघाडे २३) पोशि.२३२८८ अंगद मुळे २४) सफौ. संतोष चव्हाण (सायबर सेल) २५)मसुब. १९११७४५ सचिन चौधरी यांचा दिनांक १०/०८/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"जुलै महिन्यातील गुन्हयांची उकृष्ठ उकल"** क्र. २ म्हणुन प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.

➢ **नालासोपारा विभाग (घरफोडी ) :-**

**नालासोपारा पोलीस ठाणे गुरनं. I २२१/२०२४, भा.दं.वि.सं.कलम ४५४,३८०,३४ प्रमाणे.**

नालासोपारा पोलीस ठाणे गुरनं. I २२१/२०२४, भा.दं.वि.सं.कलम ४५४,३८०,३४ प्रमाणे फिर्यादी यांचे राहते घरी - एकविरा सावली बंगला शेजारी, प्राथमिक आरोग्य केंद्र,सोपारा - निर्मळ रोड लगत, नालासोपारा प.,ता.वसई, जि. पालघर येथे यातील फिर्यादी व त्यांचे कुटुंबातील सदस्य घरी नसतांना त्यांनी घराचा दरवाजा कडी कुलुप लावुन बंद केलेला असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे राहते घराचे लॉक असलेले कुलुप कशाचेतरी सहाय्याने तोडून घरात प्रवेश करुन घरातील बेडरुममधील लोखंडी कपाटातील ९०.०१ ग्रॅम वजनाचे एकुण ३,६०,०४०/- रुपये किमतीचे सोन्याचे दागिने फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीचे इरादयाने चोरी करुन चोरुन नेले आहेत. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणेस गु.र.क्र. I २२१/२०२४, भा.दं.वि.संकलम ४५४,३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. नालासोपारा पोलीस स्टेशनच्याकार्य क्षेत्रामध्ये गेल्या काही दिवसांपासुन घरफोडी चोरींचे प्रमाण वाढल्याने त्याबाबत वेगवेगळे स्वंतत्र गुन्हे दाखल झाल्याने परिस्थीतीचे गांभीर्य लक्षातघेवून वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. नालासोपारा पोलीस ठाणे गुरनं I २६७/२०२४, भा.दं.वि.स क ४५४, ३८०, ३४ या गुन्हयाचे घटनास्थळावर मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीत यांनी गुन्हयात वापरलेली रिक्षा क्रमांक मिळाल्याने रिक्षा चालकाची माहीती काढून रिक्षा चालक आरोपीत नामे योगेश गणपत गोविंद, वय ३० वर्षे, रा.रु.नं.३, सचिन म्हात्रे सोसायटी, वेताळ मंदीराजवळ, काल्हेर गांव, ता.भिवंडी, जि.ठाणे यास ताब्यात घेऊन त्याचेकडे केलेल्या तपासात इतर दोन आरोपीत नामे मोझम अलीहुसेन शेख व रिझवान अन्सारी, रा.बिजनौर, राज्य उत्तरप्रदेश हे सोबत असल्याचे समजले. तद्नंतर पाहीजे आरोपीत यांचा तपास करुन आरोपीत नामे मोझम अलीहुसेन शेख, वय २९ वर्षे, रा.मु.पो.सावर्डे, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी यास ताब्यात घेऊन दोघांना दिनांक १९/०७/२०२४ रोजी १८.३२ वाजता अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीत यांची पोलीस कस्टडी मिळाल्यानंतर वरीष्ठांची परवानगी घेऊन आरोपीत मोझम अलीहुसेन शेख यास सोबत घेऊन स्योहारा पोलीस ठाणे, ता.धामपूर, जि.बिजनौर, राज्य उत्तरप्रदेश येथे जाऊनत पास केला असता,पाहीजे आरोपीत रिझवान अन्सारी हा मिळून आला नाही. परंतूनमुद गुन्हयातील सोन्याचे दागिने हे आरोपीत रिझवान अन्सारी याचा सासरा नाजीम मोहम्मद निजामुद्दीन अन्सारी, रा.चक-महदुस, बिरामपूर, ता.धामपूर, जि.बिजनौर हा सोनार दुकानदारास विक्री करीत असतो म्हणून त्यास ताब्यात घेऊन तपास केला असता, नमुद गुन्हयात सोनार दुकानदाराकडून सोन्याची लगड हस्तगत करण्यात आली आहे. नाजीम अन्सारी यास नमुद गुन्हयात दिनांक २३/०७/२०२४ रोजी २०.१८ वाजता अटक करण्यात आली आहे. नमुद गुन्हयात एकूण ५१.६८० ग्रॅम वजनाचे २,७५,२१५/- रुपयांचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

**सदरची कामगिरी करणारे नालासोपारा पोलीस ठाणेचे -** १) वपोनि/विजयसिंह बागल, २) सपोनि/राजेंद्र चंदनकर, ३) पो.उपनिरी./योगेश मोरे, ४) सफौ/९५०३६ हिरालाल निकुंभ, ५) पोहवा/०३०६२ किशोरधनु, ६) पोहवा/०४००७ प्रशांत साळुंके, ७) पोना/०३०६३ अमोल तटकरे, ८)पो.अं./१६०५२ कल्याण बाचकर, ९) पो.अं./१६०६५ राजेश नाटुलकर, १०) पो.अं./१७००६ प्रेम घोडेराव, ११) पो.अं./२३४६८ बाबासाहेब बनसोडे, १२) पो.अं./२३४६९ प्रताप शिंदे यांचा दिनांक १०/०८/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"जुलै महिन्यातील गुन्हयांची उकृष्ठ उकल"** क्र. ३ म्हणुन प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.

- **वसई विभाग (चोरी) :-**

**माणिकपुर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं । २३५/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ प्रमाणे.**

माणिकपुर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं । २३५/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ प्रमाणे दाखल असुन दिनांक ०८/०७/२०२४ रोजी ०१.३० ते ०२.३० वा.चे दरम्यान शॉप नं. बी/२, मिस्त्रीनगर, साई नगर, वसई पश्चिम, जि. पालघर येथे यातील फिर्यादी यांचे शॉपपमध्ये अज्ञात चोरटयाने प्रवेश करुन एक ओप्पो कंपनीचा मोबाईल व रोख रक्कम असा एकुण ५४,०००/- मुद्देमाल चोरी केलेबाबत तक्रारदार नामे श्री. अदिल रशिद खान, वय ३७ वर्षे, यांनी दिलेल्या तक्रारीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.क्र. २३५/२०२४ कलम ३०५ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीत याचा शोध घेणेकामी वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीत याचा तांत्रिक विश्लेषण, सी.सी.टी.व्ही फुटेज व गुप्त बातमीदार यांचे मदतीने आरोपीत नामे १) आनंद शंकर हिवराळे, वय १९ वर्षे, २) संदिप श्रीराम गुप्ता, वय १९ वर्षे, यांचा शोध घेवुन त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीत यांचेकडे तपास करता दोन्ही आरोपीत यांनी वसई परिसरात अशा प्रकारे अनेक ठिकाणी मोबाईल चोरीचे गुन्हे केल्याची कबुली देवुन आरोपीत यांचेकडुन एकुण अं.किं.रु ९३,९९९/- किंमतीचे ०९ मोबाईल, रोख रक्कम व अं.किं.रु. ५०,०००/- दोन मोटारसायकल हस्तगत करण्यात आल्या आहे. तसेच सदर आरोपीत यांचेकडुन खालीलप्रमाणे गुन्हें उघडकीस आणलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | माणिकपुर | । २३५/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ |
| २. | माणिकपुर | । २३९/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ |
| ३. | माणिकपुर | । २४९/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ |
| ४. | माणिकपुर | । २५१/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ |
| ५. | माणिकपुर | । २०/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३७९ |
| ६. | माणिकपुर | । ७२/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३७९ |
| ७. | माणिकपुर | । ८७/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३८० |

**सदरची कामगिरी करणारे माणिकपुर पोलीस ठाण्याचे** १) वपोनि. राजु माने २) पो.उ.नि. सुनिल पाटील ३) पो.ह.०२०१२/शैलेश पाटील, ४)पो.ह.०७०४१/शामेश चंदनशिवे, ५) पो.ह.०७०२८/धनंजय चौधरी, ६) पो.शि. १७०२६/प्रविण कांदे, ७) पो.शि.१६०५०/गोविंद लवटे, ८)पो.शि.१६१२९/आनंदा गडदे, ९) मपोशि/पुजा कांबळे यांचा दिनांक १०/०८/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"जुलै महिन्यातील गुन्हयांची उकृष्ठ उकल"** क्र. ४ म्हणुन प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.

- **गुन्हे शाखा, सायबर पोलीस ठाणे (गोठविण्यात आलेली रक्कम तक्रारदार यांचे मुळखात्यात पुर्ववत केली) :- सायबर पोलीस स्टेशन आ.क्र.७९९/२४ दिनांक २२/०३/२०२४ प्रमाणे.**

सायबर पोलीस स्टेशन आ.क्र.७९९/२४ दिनांक २२/०३/२०२४ प्रमाणे. फिर्यादी यांनी टेलीग्राम या सोशल मिडीया वर ऑनलाईन टास्क पुर्ण करुन पैसे कमविण्याबाबतची जाहिरात पाहिली. तक्रारदार यांनी २०००/- रु चे टास्क विकत घेतल्यावर त्यांना काही रक्कम नफा मिळाल्याने तक्रारदार यांनी वेळोवेळी एकुण २२,७०,०००/- रु ची गुंतवणुक

केली. परंतु तक्रारदार कोणताही परतावा न मिळाल्याने त्यांची फसवणुक होत असल्याचे लक्षात आले. त्याअनुषंगाने सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्याने तक्रारदार यांचे वरील आर्थिक फसवणुकीच्या अनुषंगाने NCCRP PORTAL Acknowledgement No.३१९०३२४००४५८८३ अन्वये ऑनलाईन तक्रार नोंदविण्यात आली. तक्रारदार यांनी रक्कम भरलेल्या खात्यांची माहिती घेतली असता सदरची रक्कम IDFC FIRST Bank ICICI BANK व HDFC BANK या बँक खात्यांत वर्ग झाल्याची माहिती प्राप्त करण्यात आली. संशयीत खात्यांची माहिती प्राप्त करुन खात्यांतील रक्कम गोठविण्याकरीता संबंधीत बँकेना पत्रव्यवहार करण्यात आला. संशयीत खात्यांमध्ये गोठविण्यात आलेली रक्कम तक्रारदार यांचे मुळ खात्यात वर्ग होणेकरीता मा. न्यायालयात जा.क्र. २८४१/२०२४ दि १३/०४/२०२४ अन्वये सविस्तर अहवाल सादर करण्यात आला. मागील ०२ महिन्यापासुन तक्रारदार यांची रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्याकरीता मा. न्यायालय तसेच संबंधीत बँकेना तसेच बँकेना पत्रव्यवहार/पाठपुरावा करुन तक्रारदार यांची रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्याकरीता सायबर पोलीस ठाणे यांचेकडुन प्रयत्न करण्यात आले. तक्रारदार यांची फसवणुक झालेली २२,७०,०००/- पुर्ण रक्कम तक्रारदार यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.

**सदरची कामगिरी करणारे सायबर पोलीस ठाणेचे -** १) पोनि/ सुजितकुमार गुंजकर २) सपोनि/ स्वप्नील वाव्हळ ३) पोउनि/प्रसाद शेनोळकर ४) सफौ/मिलाग्रिस फर्नांडिस ५) मपोहवा/१२००७ माधुरी धिंडे ६) मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी ७) मपोअं/१३१०४पल्लवी निकम ८)पोअं/१७०५३ शुभम कांबळे ९) पोअं/२२००३ कुणाल सावळे १०) मपोअं/२३६३९ स्नेहल पुणे ११) पोअं/ २३३२१ राहुल बन १२)पोअं/२३०५७विलास खाटीक १३) पोअं/२३८३३सावन शेवाळे, सर्व नेमणूक सायबर पोलीस ठाणे यांचा दिनांक १०/०८/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"जुलै महिन्यातील गुन्हयांची उकृष्ठ उकल"** क्र. ५ म्हणुन प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.